ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 302-M (RS)**

**Code No. : 302-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ಪ್ರಥಮ ವರ್ಷ

# D.El.Ed. FIRST YEAR

ಶಿಕ್ಷಣ

**EDUCATION**

# ಮೂಲ ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳ ಪರಿಚಯ

# INTRODUCTION TO BASIC CONCEPTS

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)

( Marathi Version )

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 06. 10. 2020 ]

Date : 06. 10. 2020 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**भाग - I**

खालील प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी अति योग्य उत्तराची निवड करा आणि उत्तर-पत्रकेमध्ये उत्तर लिहा. सर्व प्रश्न सोडविणे सक्तीचे आहे : 10 × 1 = 10

1. बालक केंद्रित पद्धत या विषयाला महत्व दिल्याने अस्तित्वात आली –

(A) ज्ञान (B) समाज

(C) पाठ्यक्रम (D) वैयक्तिक.

2. समावेशक पद्धतीने यावर भर दिलला आहे –

(A) विषयाधारीत अध्यापन (B) सर्वाना समान संधी

(C) गट अध्यापन (D) प्रत्येक क्षेत्रामध्ये अध्ययन.

3. रोहितचे वय 6 वर्षे आहे. तो ढोंग करतो आणि मानसिक प्रदर्शन करतो. तर तो बौद्धीक विकासाच्या या टप्प्याचे प्रदर्शन करतो –

(A) मूर्त क्रिया (B) संवेदी चलित

(C) पूर्व-क्रिया (D) औपचारिक क्रिया.

4. जर मुले वळण कसे घेणे, इतरांकडून वस्तु एकदम न पकडणे आणि नियम पाळतात. येथे वापरलेला खेळाचा प्रकार हा आहे ?

(A) तडजोड खेळ (B) स्पर्धात्मक खेळ

(C) समांतर खेळ (D) स्वातंत्र्य खेळ.

5. एक शिक्षक त्याच्या / तिच्या वर्गखोलीमध्ये भरपूर स्लाईड्स, तक्ते, नमुने आणि चित्रे यांचा अधिक वापर करतात तर शिक्षक यांच्या गरजा पूरवित आहे असे दर्शवितो –

(A) दृश्यीय अध्ययनकर्ते (B) श्राव्य अध्ययनकर्ते

(C) स्पर्शाने अध्ययनकर्ते (D) लिखित अध्ययनकर्ते.

6. खालील विश्वास समावेशक शिक्षणाला मदत करत नाही.

I. सर्व मूलांची समान गरज आणि क्षमता असते

II. पालक आणि समुदायाचा सहभाग

III. सर्व मुले अध्ययन करत नाहीत

IV. शिक्षणाचा हक्क हा सर्व मुलांचा मुलभूत हक्क आहे.

**ह्यापैकी**

(A) I आणि II (B) I आणि III

(C) II आणि III (D) II आणि IV.

7. समवर्ती यादीत शिक्षण लादणारे कलम हे आहे.

(A) कलम 21(A) (B) कलम 350(A)

(C) कलम 256 (D) कलम 28.

8. अध्ययनाविषयो सत्य असणारी खालील विधाने कोणती ?

I. सर्व अध्ययन कर्त्यांची अध्ययन शैली सारखीच असते

II. दिलेल्या अध्ययन कर्त्याचे अध्ययन हे एक अद्वितीय असते

III. अध्ययन कर्ते त्याच्या अध्ययन वेगामध्ये वेगवेगळे नसतात

IV. शालेय पाठ्यक्रम अध्ययन कर्ते शाळेच्या आत आणि बाहेर अध्ययन करतात.

**ह्यापैकी**

(A) III आणि IV (B) I आणि III

(C) I आणि II (D) II आणि IV.

9. खालीलपैकी कोणत्या घटकानुसार भारत सरकार मुलाना मुलभूत हक्क देण्यास कटिबद्ध आहे ?
   (A) जन्म दर उच्च आहे
   (B) भ्रूण हत्येचा दर कमी झालेला आहे
   (C) भारतामध्ये बाल कामगारांची संख्या अधिक आहे
   (D) वयाच्या 18 व्या वर्षी 65% मुलींचे भारतामध्ये विवाह होतात.

10. चालताना न्यूनता असणारे बालक शाळेतील शौचालयाचा वापर करू न शकल्याने शाळेत गैरहजर राहते. या स्थितीत बालकाने सामोर गेलेली समस्या ही आहे –
    (A) भौतिक रचना (B) शारीरिक
    (C) बौद्धिक (D) मानस शास्त्रीय.

**भाग - II**

खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये : 5 × 2 = 10

11. एक व्यावसायिक शिक्षक होण्यासाठी तुम्ही घेणे क्रम प्राप्त असणाऱ्या दोन उपायांची यादी करा.
12. पाठ्यक्रम आणि अभ्यासक्रम यामधील फरक लिहा.
13. मुलाच्या ज्ञानात्मक विकासामध्ये खेळाच्या कार्याचे वर्णन करा.
14. "शिक्षणाच्या समाजशास्त्राच्या अध्ययनाची शिक्षकाला आवश्यकता आहे." या विधानाचे समर्थन करणारी चार कारणे लिहा.
15. 'तारुण्यावस्था ही ओळख शोधण्याचा काल आहे.' कारणे द्या.
16. दृष्टीदोष असणाऱ्या मुलासाठी वर्गखोलीमध्ये आह्लाददायक वातावरण कसे तयार कराल ?
17. आरक्षण धोरणाचे चार फायदे लिहा.
18. समानतेचे मुल्य वर्गखोलीमध्ये तुम्ही कसे निर्माण कराल ?

**भाग - III**

खालील प्रत्येक प्रश्नाला पर्यायो प्रश्न दिला आहे. त्यापैकी (a) किंवा (b) याचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये : 8 × 5 = 40

19. (a) 'शाळा ही एक मार्गदर्शक अध्ययनाची रचनात्मक जागा आहे.' या विधानाचे समर्थन करा.

**किंवा**

   (b) 'शाळेय शिक्षण हे सामाजिक विकासाचे साधन आहे.' या विधानाचे समर्थन करा.

20. (a) "वैयक्तिक ओळख ही विकासाची गतीशील प्रक्रिया आहे." या विधानाचे विश्लेषण करा.

**किंवा**

(b) "समाजीकरणामुळे आपल्या विचांराना, भावनांना आणि क्रियांना आकार देण्यास मदत होते." या विधानाचे विश्लेषण करा.

21. (a) एका बालकाच्या सामाजीकरणामध्ये समवयस्क गटाच्या भूमिकेचे वर्णन करा.

**किंवा**

(b) एका बालकाच्या सामाजीकरणामध्ये समुदाय आणि प्रसार माध्यमाच्या भूमिकेचे वर्णन करा.

22. (a) विविध गतीने अध्ययन करणाऱ्या अध्ययन कर्त्यांच्या समस्यांना सामोरे जाऊन तुम्ही कसे अध्यापन कराल ?

**किंवा**

(b) मूर्त क्रियात्मक टप्प्यामध्ये मुलासाठी तुम्ही कोणत्या कृतींची योजना कराल ?

23. (a) "अध्ययन ही हे हेतूपूर्वक कृती आहे." स्पष्टीकरण / विश्लेषण करा.

**किंवा**

(b) "अध्ययन ही प्रक्रिया आणि उत्पादन दोन्हीही आहे." विश्लेषण करा.

24. (a) उत्तर बाल्यावस्थेच्या भावनात्मक विकासाच्या गुणलक्षणांचे वर्णन करा.

**किंवा**

(b) तारुण्यावस्थेच्या काळातील भावनात्मक विकासाच्या गुणलक्षणाचे वर्णन करा.

25. (a) "ऋणात्मक दृष्टीकोन हा समावेशक पद्धतीमधील मोठा अडथळा आहे." विश्लेषण करा.

**किंवा**

(b) 'अध्यापनशास्त्र आणि मौल्यमापन पद्धत ही प्रतिकुल मुले शिक्षण प्रवाहापास्न् वंचित राहण्यास कारणीभूत आहे.' या विधानाचे विश्लेषण करा.

26. (a) विविध प्रवाहाद्वारे आलेल्या मुलाना संधी उपलब्ध करून देण्यासाठी पाच उपाय सुचवा.

**किंवा**

(b) प्रतिभावंत बालकांसाठी अध्ययन अधिक मनोरंजक आणि समर्पक करण्यासाठी पाच उपाय सांगा.